● शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १७६ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# लाडक्या बहिणींचा एकनाथभाऊ उद्या जालन्यात

## लाडक्या बहिणींना मार्चच्या बजेटमध्ये एकवीसशे रु.चा निर्णयाची शक्यता - आ. खोतकर; आझाद मैदानावर आभार मेळाव्याचे आयोजन



**जालना । प्रतिनिधी -** येत्या मार्च २०२५ च्या बजेटमध्ये लाडक्या बहिणींना एकवीसशे रुपये देण्याचा निर्णय होणार असल्याचा विश्वास आमदार अर्जुनराव खोतकर यांनी येथे व्यक्त केला. लाडक्या बहिणींचा एकनाथभाऊ शिंदे हे २५ जानेवारी २०२५ रोजी जालना दौऱ्यावर येत असून दुपारी ४ वा. आझाद मैदानावर लाडकी बहिण व शिवसेनेच्या विशाल मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आ. खोतकर यांनी गुरुवार (दि २३) आयोजित पत्रकार परिषदेत दिली. जिल्ह्यातील लाडक्या बहिणी, शिवसेना पदाधिकारी-कार्यकर्त्यांसह नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहनही यावेळी आ. खोतकर यांनी केले.

या पत्रकार परिषदेला शिवसेनेचे संपर्क प्रमुख पंडीत भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णु पाचफुले, ॲड. भास्कर मगरे आदींची उपस्थिती होती.

आ. खोतकर यांनी सांगितले की, राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच माजी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे यांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात धडाडीचे निर्णय घेतले, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित विषय शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात मार्गी लावले. त्यामुळेच महायुतीचा मोठा विजय झाला आहे. महायुतीच्या विजयाचे एकनाथराव शिंदे हेच शिल्पकार आहेत. २६७ जागांचे बहुमत हा एक इतिहास झाला आहे. भुतकाळात कधीही ऐवढे मोठे बहुमत कुणाला मिळालेले नव्हते. मुख्यमंत्री असतांना शिंदे यांनी विविध समाज घटकाला महामंडळे दिली. त्यातील बरिचशी पुर्ण झाली आहेत काही होत आहेत. त्यांच्या कार्यकाळात केलेल्या कामांमुळे त्यांची जनसामान्यांपर्यंत एक वेगळी प्रतिमा पसरली आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याविषयीची ओढ आणि प्रेम हे येणाऱ्या २५ तारखेला जाणवेल. यासाठी शिवसेना जिल्हा, तालुका, शहर, प्रभाग, वार्ड, अंगीकृत संघटना कामाला लागल्या आहेत. मोठा न भुतो न भविष्यती असा मेळावा होणार असल्याचे सांगतांना आ. खोतकर यांनी बोलण्याचे धाडस करतो म्हणत मा. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जशा सभा होत होत्या त्या प्रमाणे एकनाथ शिंदे यांची सभा होईल असा विश्वास व्यक्त केला. सुमारे पाच हजार महिला फेटे घालून शिंदे यांचे स्वागत करणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्यभर दौरे करणार आहेत. या दौऱ्यांची सुरुवात जालन्यातून होत आहे. विधानसभा विजयानंतर त्यांचा हा पहिला आभार दौरा आहे. ते लाडक्या बहिणींचे आभार मानण्यासाठी जालन्यात येत आहेत. तसेच नवीन सरकार नवीन जबाबदारी तसेच पक्ष बळकटीकरणासाठी हा दौरा महत्त्वाचा ठरणार आहे. शहरातील विविध प्रश्न त्यांच्या पुढे आपण मांडणार असून जालन्याच्या विकासाला चालना देणारा हा दौरा ठरणार असल्याचेही आ. खोतकर म्हणाले.

लाडक्या बहिणींना एकवीसशे रुपये केव्हापासून मिळणार असा प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी येत्या मार्च २०२५ च्या बजेटमध्ये एकवीसशे रुपये देण्याचा निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.



### वेळ द्या, बदल दाखवतो - आ. अर्जुनराव खोतकर

उपमुख्यमंत्री अजित पवार जालना दौऱ्यावर असतांना त्यांनी जालन्यातील स्वच्छता व कामकाजांवर बोट ठेवत अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली. आ. अर्जुनराव खोतकर यांनाही याबाबत जबाबदार धरले यावर बोलतांना अर्जुनराव खोतकर यांनी अजित पवार जे बोलले ती वस्तुस्थिती आहे. त्यांनी अधिकाऱ्यांनाही झापले आहे. मी आमदार होऊन आज दोन महिने पुर्ण झाले आहेत. त्यामुळे हे जे काही अजित पवारांनी पाहिले ते पुर्वीचे आहे. त्यांच्या बोलण्याचे वाईट वाटत नाही. मला थोडा वेळ हवा आहे तो द्या मी बदल दाखवतो. गेल्या दोन महिन्यात केलेल्या कामांचा पाढा यावेळी आ. खोतकर यांनी वाचला. शहरात अनेक प्रश्न आहेत ते येत्या काळात मार्गी लावणार असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### दावोस संधी ...

निवडा हवी ती रत्ने
भरला खुला दरबार
संधीचे करावे सोने
वेळ ना येते बारबार
दावोसी सुवर्णसंधी
घडवा छान अलंकार
दुफळी एकमेकांतली
लांब ठेवावा अहंकार
सत्ताधारी विरोधकांत
समन्वय करी साकार
लोक कल्याणासाठी
घ्यायचा मैत्री आकार
बदलू पाहे वातावरण
जाण प्रगतीचा हुंकार
वाट पाही बेरोजगार
घडावे काही चमत्कार
सामंजस्य करे करार
परिपूर्ण ते सोपस्कार
समृद्धीचा नवगणेशा
प्रसन्न होईलं ओंकार
प्रत्यक्षांत यावे करार
प्रकल्प सार्थ इकरार
खुस्पट काढून काही
नंतर नको रे इन्कार
कुणाचे वर्तन कसले
पहात असे मतदार
आज बसे विरोधात
उद्या खुले संधी द्वार

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# गोमातेला राज्यमातेचा दर्जा देणारे सरकार तिच्या रक्षणाबाबत मौन का?- प. पू. राधाकृष्णजी महाराज

## जनतेने कचरा प्लास्टिक कॅरीबॅगमध्ये फेकून गोमातेच्या आरोग्याशी खेळू नये

**जालना । प्रतिनिधी -** राज्य सरकारने गोमातेला राज्य मातेचा दर्जा दिला, हे अभिमानास्पद बाब आहे. मात्र, ठिकठिकाणचे प्लास्टिकमय कचऱ्याचे ढिगारे आणि घराघरातून कचरा भरलेल्या प्लास्टिक कॅरीबॅग खाण्याने गोमातेचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. पोटात चाळीस -चाळीस किलो प्लास्टिक निघते आहे. याबाबतीत मात्र गोमातेला राज्यमातेचा दर्जा देणारे शासन आणि प्रशासनही मुग जुळून गप्प आहे, असा संतप्त प्रश्न गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांनी सरकारला विचारला. जनतेनेही प्लास्टिक कॅरीबॅगमध्ये कचरा रस्त्यावर अथवा कचऱ्याच्या ढिगारावर फेकू नये, असा सल्ला देत प्लास्टिक कॅरीबॅगमध्ये कचरा फेकून गोमातेच्या आरोग्याशी खेळू नका, अशी कळकळीची विनंती सर्वांना केली आणि प्लास्टिकचा कमीत कमी वापर करू, रस्त्यावर प्लास्टिक कचरा फेकणार नाही, असा संकल्प उपस्थितांकडून वदवून घेतला.

श्रीमद् भागवत कथा सेवा समिती आणि सनातन हिंदू समाज यांच्यावतीने जालना शहरातील भोकरदन रोडवरील ब्रजधाममध्ये आयोजित श्रीमद् भागवत कथेच्या आज गुरुवारी (ता. २६) सहाव्या दिवशी गोवर्धन प्रसंगाच्या अनुषंगाने ते बोलत होते. यावेळी नाशिक येथील श्री दत्ताश्रमचे दत्तोपासक प. पू. दत्तदास महाराज, भागवताचार्य सेलू येथील भगीरथ महाराज, राजेश महाराज सामनगावकर, विनायक महाराज फुलंब्रीकर आदींची उपस्थिती होती. राधाकृष्णजी महाराज पुढे म्हणाले की, आज आपण श्री ढवळेश्वर महाराजांच्या दर्शनाला जात असताना, एक महिलेने कचरा असलेली कॅरीबॅग रस्त्याच्या बाजूला असलेल्या ढिगाऱ्यावर फेकली. ती या ठिकाणी कचऱ्यात खाद्य शोधणाऱ्या गोमातेच्या शिंगावर आढळली. त्यामुळे मनाला अतिशय वेदना झाल्या. राज्यमातेला अशी वागणूक मिळणार का? भुकेने व्याकुळ गोमाता करणार तरी काय? कचरा असलेली कॅरीबॅग उघडत नाही आणि ती भुकेमुळे प्लास्टिकसह ती खाऊ लागते. प्लास्टिक पोटात गेल्याने अन्ननलिका जाम होते आणि पोट फुगते. अशा प्रकारात दवाखान्यात गेल्यानंतर ३० ते ४० किलो प्लास्टिक आढळून आल्याच्या अनेक घटना आहेत. मुख्यमंत्री गोभक्त आहेत. गोमातेचे पूजन करून त्यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ ग्रहण केल्याचे सांगण्यात आले. अभिमान वाटला. त्यांच्याच सरकारने गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिला. मात्र, राज्यमातेचे काय हाल होत आहेत? या गोमातेवर घाणेरडा कचरा, प्लास्टिक खाण्याची वेळ येत आहे. या राज्यमातेचे रक्षण कोण करणार? शासन **पान २ वर**



# जाफ्राबाद तालुक्यातील आळंद, हनुमंत खेडा शिवारात अवैध वाळू उपसावर कारवाई!


## खडकपूर्णा धरणातून लहान मोठ्या १२ बोटीसह ९० लाखांचा मुद्देमाल हस्तगत?

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यामधील जाफ्राबाद तालुक्यातील आळंद, हनुमंत खेडा शिवारात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाई मध्ये खडकपूर्णा धरणातून लहान मोठ्या १२ बोटीसह ९० लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. जाफराबाद तहसील कार्यालय,एन.डी.आर.एफ टीम जालना यांच्यासह टेंभूर्णी पोलीस यांनी संयुक्तरित्या ही कार्यवाही केली आहे.

मात्र, कारवाई दरम्यान बोटीवरील बोट चालक व इतर साथीदार सदरील बोटी सोडून पळ काढण्यात **पान २ वर**



# भाजपाच्या वतीने बाळासाहेब ठाकरे व सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी -** हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे व महान स्वातंत्रता सेनानी स्व.सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती निमित्त आज दि. २३ जानेवारी २०२५ रोजी भास्कर दानवे यांच्या चित्रकुट निवास्थानी प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, जालना महानगर जिल्हाध्यक्ष सतिष जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, स्वीय सहाय्यक गोवर्धन कोल्हे, वसंत शिंदे, राजेश जोशी, सतीश केरकळ, मुकेश चव्हाण, बद्री भसांडे, **पान २ वर**

# संपादकीय

## भारताच्या आण्विक शक्तीचे जनक

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### टेंभुर्णी येथील प्रभात फेरी महेश गिरी महाराज यांच्या उपस्थितीत संपन्न

# अखंड हरीनाम आणि गाव परिक्रमा सुरूच; प्रभात फेरीला दहा वर्ष पूर्ण

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** विठ्ठल नामाचा गरज जयजय कार करत देवाचे नित्य नामस्मरण करत गेल्या दहा वर्षा पासून सुरू असलेल्या फेरी ने आज अकराव्या वर्षात पदार्पण केले. राजूर येथील सप्ताह मध्ये सुरू असलेल्या कार्यक्रम दरम्यान एक दिवस टेंभुर्णी येथे सुरू झालेल्या फेरीला बघता बघता आज दहा वर्ष पूर्ण झाले. टेंभुर्णी येथील श्री राधाकृष्ण महाराज यांच्या हस्ते सुरू झालेली फेरीला आज दहा पूर्ण वर्ष झाले असून अकराव्या वर्षी पदार्पण झाल्या बद्दल फेरीत सहभाग घेणाऱ्या सर्वांचे या वेळी गौरी आश्रमाचे मठाधिपती श्री महेश गिरी महाराज यांनी विशेष स्वागत केले.या वेळी देवाच्या नामस्मरण ने आपल्या सह सृष्टीचे ही उधार होते त्या मुळे या नामस्मरण याला खूप महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. प्रभात फेरीला खूप महत्व असून प्रभात फेरी नामस्मरण करता वेळी पडणारे पाऊल हे तुमच्या सर्वांच्या जीवनात येणारी अडचण दूर करणारी राहील.

फेरीतून होणारी साधना खूप मोठी असून हे होणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. सगळ्यांनी या फेरीत सहभाग घेतला पाहिजे. ज्यांना फेरीची आवड त्यांना जीवनात येऊन आपला सहभाग नोंदविला त्यांचे येणारी आयुष्य कल्याणकारी होते.फेरी नित्यनियम होणे म्हणजे नक्कीच तुमच्या पाठीमागे देवांची अदृश्य शक्ती असून ती शक्ती तुमच्या कडून हे कार्य करून घेत आहे. हे खूप महत्वाचे असून तुमच्या पाठीमागे असणारी ताकद खूप मोठी आहे. असे ही मत या वेळी मांडले.गांवकरी यांच्या कडून होणारी ही फेरी नित्य नियम सुरूच राहिली



अशी ही आशा या वेळी व्यक्त केली. या कार्यक्रमाला प्रभात फेरीला नित्य नियम उपस्थिती राहणाऱ्या महिला सदस्य पुरुष सदस्य यांची मोठी उपस्थिती होती. या वेळी सूत्र संचलन अलकेश सोमाणी यांनी केले तर फेरी तर्फे रामराव जमधडे यांनी महेश गिरी महाराज यांचे स्वागत केले.या वेळी रघुराम उखर्डे यांनी आपले मनोगत मांडले आभार संजय राऊत यांनी मानले अल्पोऊपहाराणे कार्यक्रमाची सांगता झाली.

# प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या संकल्पनेतून बालगोपालांसाठी आनंदोत्सव

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील सुरेखा प्रार्थमिक विद्यालय, जुना जालना येथे शुक्रवार, २३ जानेवारी रोजी लहान मुलांसाठी एका अनोख्या आणि रंगतदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गोवत्स प. पू. गोवत्स राधाकृष्णजी महाराजांच्या संकल्पनेतून आणि त्यांच्या उपस्थितीत साकार झालेल्या या आनंद नगरीने बालगोपालांसाठी एका अविस्मरणीय दिवसाची अनुभूती घडवली.



या कार्यक्रमात मुलांसाठी आकर्षक आणि मजेशीर खेळांची रेलचेल होती. मिकी माऊससह मैदानावर मुलांनी हसत-खेळत वेळ घालवला. जंपिंग जपाकच्या उड्या, आणि खास आवडीचा खेळ बुद्धी के बाल यांनी सर्वांनाच भारावून टाकले. प्रत्येक खेळामध्ये मुलांची गुंतवणूक पाहून पालकही भारावून गेले.

स्वादिष्ट खाद्य पदार्थांचा आनंद

खेळांव्यतिरिक्त या कार्यक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे खाद्यपदार्थांची विविधता. मुलांना त्यांच्या आवडीचे पदार्थ भरपूर प्रमाणात मिळाले. बॉम्बे भेल, सेवपुरी, दहीपुरी, स्वीटकॉर्न, गुलाब जामुन आणि इडली-चटणी यांसारख्या स्वादिष्ट पदार्थांनी मुलांच्या आनंदात भर घातली.

अनोखा समारोप

कार्यक्रमाच्या समारोपात एक खास क्षण अनुभवास आला. प्रत्येक विद्यार्थ्याला खेळणी वाटप करण्यात आली. अनपेक्षितपणे मिळालेल्या या भेटींमुळे मुलांचा आनंद ओसंडून वाहत होता. हसऱ्या चेहऱ्यांनी आणि उत्साही उर्जेने परिपूर्ण वातावरणाने प्रत्येकाच्या मनात आनंदाचा ठसा उमटवला.

बालपणाचा आनंद द्विगुणीत करणारा उपक्रम

गोवत्स प. पू. गोवत्स राधाकृष्णजी महाराजां श्रेझारींक्षरश्रपर२०१५सारळश्र. ले नी बालकांच्या आनंदासाठी व त्यांच्या विकासासाठी उचललेले हे पाऊल खरोखरच कौतुकास्पद आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली साकार झालेली आनंद नगरी मुलांच्या चेहऱ्यावर आनंदी हास्य फुलवणारा उपक्रम ठरला.

हा कार्यक्रम केवळ मुलांसाठीच नव्हे, तर उपस्थित पालक आणि शिक्षकांसाठीही एक सुखद अनुभव देऊन गेला.

## मंठा शहरामध्ये रक्तदान शिबीर



**मंठा । प्रतिनिधी -** कृषी उत्पन्न बाजार समिती येथे हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मा श्री बाळासाहेब ठाकरे व आजाद हिंद सेनेचे संस्थापक मा सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमीत्य विनम्र अभिवादन करण्यात आले व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. त्यावेळी मा.श्री.ए.जे.पाटील बोराडे शिवसेना जिल्हाप्रमुख जालना सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा संतोषराव वरकड,लक्ष्मण टोप्पे,डिगांबर बोराडे युवासेना तालुका प्रमुख मंठा संस्थापक अध्यक्ष धर्मवीर शंभु राजे बहुउद्देशींय सेवाभावी संस्था मंठा,कुलदीप बोराडे,वझीर पठाण युवासेना तालुका सचिव मंठा, नानासाहेब बोराडे उप शहर प्रमुख मंठा,गोपी गायकवाड युवासेना शहर प्रमुख मंठा, बाबा राठोड, पप्पु दायमा, बबनराव शेळके, भागवत चव्हाण युवासेना उप तालुका प्रमुख मंठा, विकास घनवट युवासेना उप शहर प्रमुख मंठा,दत्ता काळे युवासेना मिडिया प्रमुख मंठा,एका बोराडे,विष्णु बहाड युवासेना उप तालुका प्रमुख मंठा,मनु गिरी युवासेना उप तालुका प्रमुख मंठा, संतोष शेंडगे युवासेना विभाग प्रमुख हेलस,संदिप राठोड,रमण टोप्पे,व युवासेना मंठा तालुक्यातील पदाधिकारी आदिंची उपस्थिती होती.

## नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** येथील जिल्हाधिकारी कार्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

# आमोदिनी फाऊंडेशनचा तिसरा वर्धापनदिन जल्लोषात साजरा

**पुणे । प्रतिनिधी -** गुरुनाथ तिरपणकर)सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणा-या विशेष करून महिलांचे प्रश्न सोडवुन त्यांना समुपदेशन करणा-या पुण्याच्या आमोदिनी फाऊंडेशनचा तिसरा वर्धापनदिन नुकताच जल्लोषात साजरा झाला.सदर कार्यक्रमाची संपुर्ण थीममहिलांचे मानसिक स्वास्थ्यही होती. सदर कार्यक्रमास अतिथी/प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राणी खेडीकर (बालकल्याण समिती अध्यक्षा) उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरूवात मेहना झुझम यांनी सावित्रीबाईंच्या मनोगताने केली.यावेळी प्रमुख पाहुण्या डॉ.राणी खेडीकर मॅडम यांचा यथोचित सत्कार आमोदिनींनी शाल आणि साडी नेसवून केला.प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करताना देहविक्री करणा-या स्त्रिया आणि त्यांची मुले यांची सत्यपरिस्थिती,त्यांना येणा-या अडचणी त्यासाठी राणी ताई करत असलेले कार्य, अशा मुलांकडे आपण समाजाने बघायचा दृष्टीकोन बदलणे कसे आवश्यक आहे,त्याची गरज आणि अशा स्त्रियांना ख-या अर्थाने सक्षम करून त्यांचे मनस्वास्थ टिकविण्यासाठी काय करता येईल याविषयीची माहिती दिली.राणी ताईंनी दिलेल्या भावनिक सादेमुळे सर्व आमोदिनींना अगदी हेलावून टाकले होते.सदर कार्यक्रमास एमआयटी लॉ कॉलेजच्या डीन डॉ.सपना देव मॅडम उपस्थित होत्या.तसेच जेष्ठ वकील माधवी पोतदार मॅडम,एडवोकेट सुनिता बंसल मॅडम इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमांमध्येच कष्टकरी मावशी यांचा सन्मान त्यांना दैनंदिन जीवनात लागणा-या वस्तू म्हणजेच स्टील डबा



आणि पिशवी देऊन आनंदाने करण्यात आला. तसेच मेहना या आमोदिनीने कष्टकरी मावशींना ओवाळले.तसेच सर्वांना हळदीकुंकू देऊन वाण देण्यात आले. सदरचे वाण व गिफ्ट आमोदिनी प्रीती शिंगवी आणि सौ.अश्विनी यांनी दिले. सदर कार्यक्रमानंतर बोलताना उपस्थित अनेक महिलांनी आमोदिनी फाउंडेशनचे कौतुक केले.तसेच आम्हाला मोलाचे मार्गदर्शन मिळाले आणि आम्हीही तुमच्या कार्यात सहभागी होऊ असे आश्वासन दिले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आमोदिनी फाऊंडेशनच्या अध्यक्षा एडवोकेट अनिशा फणसळकर, उपाध्यक्षा रश्मी जोशी, सचिव एडवोकेट संध्या बागुल, खजिनदार एडवोकेट नीलिमा चव्हाण तसेच टीम आमोदिनी माधवीताई, अश्विनीताई, चिरंजीवी ताई, चित्राताई, मोनाताई, मेघनाताई, प्रीतीताई, पल्लवी ताई, अनिताताई, कल्पनाताई, मृणाल ताई यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एडवोकेट अश्विनी कळंबकर यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. आणि व्हीडीओ शुट महाराष्ट्र २४तासच्या अमिता कदम यांनी केले.

पान १ वरुन

## गोमातेला ...

आणि प्रशासन मौन का?, हा माझा प्रश्न आहे. मला कुणा सरकारबद्दल आस्था अथवा द्वेष नाही. त्यात मला जायचेही नाही. मात्र, मी अनेक वर्षापासून महाराष्ट्रात येत आहे. कथा करत आहे, येथील मीठ खात आहे, त्यामुळे सरकारला जाब विचारायचा मला अधिकार असल्याचे सांगून त्यांनी प्लास्टिकचा जास्त वापर करणार नाही, कॅरीबॅगमध्ये रस्त्यावर कचरा फेकणार नाही, दुकानदाराकडून प्लास्टिक पिशव्यात सामान स्वीकारणार नाही, अशी प्रतिज्ञा त्यांनी उपस्थितांकडून करून घेतली. सर्वांनी हात उंचावत संकल्प केला.

आजच्या कथेत महाराजांनी आई-वडिलांना विश्वासात न घेता जीवनसाथी निवडण्याच्या निर्णयावर भाष्य करताना, तुम्हाला जन्म देऊन आतापर्यंत सांभाळ करणाऱ्या आई-वडिलांना जीवनसाथी निवडण्याच्या निर्णयात सहभागी न केल्यास तुम्ही कदापिही सुखी राहू शकणार नाहीत, असे स्पष्टपणे सांगितले. व्यर्थ आकर्षणाला फसू नका. आजकाल मुली मोठ्या शहरात जीवनसाथीची अपेक्षा करत आहेत. आता परदेशाचेही फॅड वाढले आहे. अमेरिका, लंडन, जर्मनीतदेखील काही मुलींनी संसार थाटला आहे. गेल्या तर हरकत नाही मात्र निदान तेथील भारतीयाशीच लग्नगाठ बांधा. एकेकाळी परदेशात जाणे म्हणजेच भारताची सीमा ओलांडणे गुन्हा समजले जायचे. त्यांना शिक्षा केली जायची. आज काय चालले आहे. परदेशात नोकरी, तिकडेच स्थायिक व्हायचे, अशी विषम परिस्थिती बघता मन खिन्न होते, असे ते म्हणाले. अक्रूर कृष्णाला गोकुळातून मथुरेत घेऊन जातात. हा विरहाचा प्रसंग वर्णन करताना, संपूर्ण मंडप भावूक झाला. महाराजांनाही अश्रू अनावर झाले.

आजच्या कथेला उपस्थित दत्तोपासक प. पू. दत्तदास महाराज यांच्या प्रेरणेनुसार यापुढे कथासोहळ्यात श्रोत्यांसाठी टाकण्यात येणाऱ्या चटाया वगैरेचा वापर न करता गोमातेच्या शेणाने त्या जागेचे करण्याचा नियम अंमलात आणणार आहोत. लेपणानंतर वाटल्यास चटाया टाकता येतील, असे सांगितले. कथेला भाविकांची या संख्येने उपस्थिती होती. उद्या शुक्रवार दि. २४ जानेवारी रोजी श्रीमद् भागवत कथेचा समारोप होत असून, सकाळी दहा वाजता कथेला सुरुवात होणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जाफ्राबाद तालुक्यातील ...

यशस्वी झाले आहे. या बोटी एन.डी.आर.एफ जवानाच्या मदतीने ताब्यात घेत हनुमंतखेडा शिवारातील नाल्यात सदरील बोटीवरील इंजिन जिलेटीनच्या सहाय्याने ब्लास्ट करून त्या बोटी इंजिनसह निकामी करण्यात आल्या आहेत. मागील बऱ्याच महिन्यांपासून अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर कार्यवाही करण्यासाठी तालुक्यातील नागरिकांकडून मागणी होत होती. मात्र, या माफियांवर कुठलीच कारवाई होत नसल्याने यामागे कोणाचा वरदहस्त आहे, की काही हित संबंध आहे, अशी शंका सामान्य नागरिकांना येत होती. या बाबतीत अनेक वर्तमानपत्रात अनेकदा बातम्या देखील प्रकाशित करण्यात आल्या होत्या. मात्र कुठलीही ठोस कार्यवाही केल्या जात नव्हती. तर नुकत्याच झालेल्या कारवाईत वाळू माफियांवर तहसील कार्यालयाने पोलीस ठाण्यात लगेच गुन्हे दाखल कारणे अपेक्षित होते. मात्र तसे घडले नाही व प्रसिद्धीसाठी प्रेस नोट किंवा सविस्तर माहिती दिली गेली नाही. यामुळे झालेली कार्यवाहीचे पुढे नक्की काय होणार? हा प्रश्न मोठा प्रश्न जनतेसमोर आहे.

जाफराबाद तालुक्यातील अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफिया विरोधात वारंवार येणाऱ्या तक्रारीची दखल घेत जाफराबाद तहसीलदार सारिका भगत व त्यांचे कर्मचारी, एन.डी.आर. एफ टीम जालना व माझे सहकारी यांच्यासह सदरील वाळू माफियांवर संयुक्त कार्यवाही केलेली आहे, मात्र वाळू माफिया विरोधात अद्यापपर्यंत तहसील कार्यालयाने तक्रार न दिल्यामुळे सदरील गुन्हा नोंद होऊ शकला नाही, अशी माहिती टेंभूर्णी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन खामगळ यांनी दिली आहे.

## भाजपाच्यावतीने ...

बाबुराव भवर, सुखदेव महाराज गोरे, निवृत्ती लंके, कृष्णा गायके, आकाश देशमाने, दत्ता जाधव, नागेश अंभोरे, गोविंद चौरे, विकास कदम, राम जाधव, नितीन कायंदे, बाबासाहेब शेळके, विठ्ठल नरवडे आदींची उपस्थित होती.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश प्र.अपर जिल्हादंडाधिकारी शशिकात हदगल यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. २३ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## विविध सामाजिक उपक्रम राबवून बाळासाहेबांना जयंतीनिमित्त अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** हिंदूहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबवून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या हस्ते शिवसेनाप्रमुखांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून शहरातील गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, वादविवाद स्पर्धा आदींचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, माजी सभापती देवनाथ जाधव, शहर प्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोटीवाले, माजी नगरसेवक जे.के. चव्हाण, गंगुताई वानखेडे, विजय पवार, मंजुषा घायाळ यांची उपस्थिती होती.

विविध ठिकाणी झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पक्ष संघटनेत ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण हा मूलमंत्र घालून दिला. त्याप्रमाणे मुंबईसह राज्यात शिवसेनेच्या माध्यमातून रक्तदान शिबिर, रुग्णवाहिका, गोरगरिबांना मदत, कोणतत्याही अडी-अडचणीच्या व संकट समयी शिवसैनिक सर्वात अगोदर धाऊन जातो. त्याच्या गळ्यातील भगवा रुमाल हा शिवसैनिकांची ओळख बनला. राज्यभर पक्षाच्या उभारलेल्या शाखांचे जाळे बाळासाहेबांची कल्पकता होती. या शाखा सामान्य माणसाला मोलाचा आधार वाटायच्या. दुर्दैवाने आजच्या बदलत्या परिस्थितीत राजकारण सत्ता व गुत्तेदारी भोवती फिरत आहे. शिवसेनाप्रमुखांच्या विचारामुळे सामान्य माणूस आमदार, खासदार, मंत्री होऊ शकला पण पुढे अनेकांनी पक्ष सोडला. परंतु आजही सामान्य माणूस मात्र बाळासाहेबांच्या विचारासोबत ठाम उभा आहे. त्यामूळे तरुण पिढीने केवळ सत्तेसाठीच नव्हे तर सामाजिक कार्यासाठी तत्पर राहावे व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या सोबत काम करावे. असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले. यावेळी दर्शन चौधरी, जीवन खंडागळे, सखावत पठाण, गणेश लाहोटी, अजय रोडे, सावता तिडके, रामेश्वर कूरील यांच्यासह आदी शिवसैनिकांची उपस्थिती होती.

रक्तदान शिबीराला प्रतिसाद हिंदुर्हृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्त शहरातील मोरांडी मोहल्ला येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन दिनकर चोरमारे यांनी केले व हे रक्तदान यशस्वी करण्यासाठी विनोद भालेकर, भगवान बारवकर, नामदेव तिडके, विलास

येवले, महेश भालेकर, अक्षय चोरमारे, अभिषेक जोगदंड, किरण चोरमारे, कैलास भालेकर यांनी परिश्रम घेतले.

# माणसाचे मन मातीशी जुळल्यास अहंकार आपोआप गळून पडतो - कुलकर्णी

**जालना । प्रतिनिधी -** माणसाचे मन मातीशी जुळल्यास, अहंकार आपोआप गळून पडतो, तो आपल्या परिश्रमातून कृतिशील कार्य करतो, असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप कार्यक्रमात सायगाव (डोंगरगाव) येथे पोलीस उपआधीक्षक श्री. अनंत कुलकर्णी यांनी केले.

जेईएस महाविद्यालय जालना च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'युवकांसाठी डिजिटल साक्षरता 'या विषयावर विशेष श्रमसंस्कार शिबिराचे दि.१६ते २२ जानेवारी दरम्यान सायगाव (डोंगरगाव )ता.बदनापूर जि. जालना येथे आयोजन करण्यात आले होते.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून जालनाचे जिल्हा पोलीस उपाधीक्षक श्री. अनंत कुलकर्णी तसेच सायगाव चे पोलीसपाटील श्री शत्रुघ्न बरांडे व दूधना शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. ज्ञानदेव घनघाव हे होते. व्यासपीठावर आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. पंढरीनाथ उनवणे आदीची उपस्थिती होती.

यावेळी राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राजेश सरकटे यांनी केले. यावेळी सात दिवसाचया शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केलेल्या श्रम दानाच्या कामांची माहिती त्यांनी सांगितली.

जेईएस महाविद्यालयातर्फे सायगाव -डोंगरगाव येथे 'स्वच्छ घर - सुंदर घर' ही स्पर्धा ग्रामस्थ महिलांसाठी ठेवण्यात आलेली होती. यातील विजयी महिलांना अनुक्रमे प्रथम क्रमांक३000/- द्वितीय क्रमांक २000/- तृतीय क्रमांक १000/- उत्तेजनार्थ ५00/-रुपयांचे रोख बक्षिसे प्रमुख पाहुणे च्या हस्ते देण्यात आलेत.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना जिल्हा पोलीस उपाधीक्षक श्री



अनंत कुलकर्णी म्हणाले की, माणसाचे मन मातीशी जोडल्यास आपोआप अहंकार गळून पडतो. त्यांच्या परिश्रमातून कृतिशील कार्य घडते, पुढील दहा वर्षात युवाशक्ती देशाचा चेहरा बदलू शकते ,युवकच देशाची खरी शक्ती आहे, त्यांनी गुन्हेगारीकडे न वळता समाजकार्य व विधायक कार्याकडे वळावे, श्रमदान हे अतिशय श्रेष्ठ कार्य आहे श्रमाची कुठलीही लाज माणसाला नसावी , जीवनामध्ये शरीर संपदा सुदृढ असणे आवश्यक आहे, आई-वडिलांचे श्रममूल्य युवकांनी जीवनात विसरू नये,असेही श्री. कुलकर्णी यांनी सांगितले.

अध्यक्ष भाषणात प्राचार्य डॉ. अग्निहोत्री म्हणाले की, युवकांसाठी सर्वच काम सारखी असून कुठल्याही अहंकार त्यांनी मनात बाळगू नये,'नॉट मी बट यु' म्हणजेच माझ्यासाठी नव्हे केवळ तुमच्यासाठी मी कार्य करेल, असे वागावे. मानवाकडे सहजीवन, सहअस्तित्व ,सहकार्य असावे, शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवून युवकांनी कार्य करावे असेही त्यांनी सांगितले.

यावेळी शिबिरार्थी विद्यार्थी तसेच सायगाव-डोंगरगाव येथील ग्रामस्थ व आदर्श विद्यालय सायगावचे विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच प्रा. किशोर तापडिया, प्रा.नागनाथ शेवाळे, प्रा. सूर्यकांत चौगुले ,प्रा. सुनिल इंदूरकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. योगेश लहामटे यांनी मानलेत.

शिबिर यशस्वी करण्याकरता श्री. भरत अहिरे ,श्री. आनंद काळे श्री. विजय सुलाने, श्री .आकाश ठोंबरे श्री. गजानन घोडके यांनी विशेष परिश्रम घेतलेत.

## धमकी देणाऱ्या विरोधात गुन्हा नोंदवा

### पोलिस अधिक्षकांकडे भीम आर्मीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** राणीउंचेगाव (ता. घनसावंगी) गावाजवळील कृष्णानगर तांडा येथील एका पाण्याच्या जार प्लाटजवळ शिवीगाळ करून, जीवंत मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी ओम प्रकाश मंत्री व त्यांच्या इतर नातेवाईका विरोधात अंबड पोलिस ठाण्यात अर्ज दाखल केला. मात्र अंबड ठाणेप्रमुख जाधव यांनी या तक्रारीची चौकशी केली नाही व गुन्हा नोंद केला नाही. तरी याबाबत चौकशी करून, ओम प्रकाश मंत्री यांची चौकशी करून, त्यांच्याविरूध्द गुन्हा नोंदवावा, अशी मागणी भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष सुभाष दांडेकर यांनी केली आहे.

५ जानेवारी २०२५ रोजी भीम आर्मीचे जिल्हा सल्लागार रामेश्वर भानुदास शिंदे हे ५ जानेवारी २०२५ रोजी मुलासह राणीउंचेगाव जवळील कृष्णानगर तांडा येथील कैलास राठोड यांच्या पाण्याच्या जारचे उद्घाटन करून,मोटार वाहन क्र. एम.एच. २१ सीए ७३०२ या गाडीने मुलासह व नातुसह परत येतांना गावातील ओमप्रकाश मंत्री यांनी त्यांचे इनोव्हा व्हाईट कलरची कार क्र. एम एच २१ सीए 00३३) जानून बुजून रस्त्यावर उभी केली. व गाडीत बसून शिवीगाळ केली. तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. याबाबत अंबड ठाणेप्रमुख जाधव यांना प्रत्यक्ष भेटून याबाबत रितसर तक्रार दिली. मात्र अजूनही तक्रारीची दखल घेतली नाही अथवा चौकशी केली नाही. तरी याबाबत गुन्हेगाराची चौकशी करून गुन्हा नोंदवावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष सुभाष दांडेकर यांची स्वाक्षरी आहे.

### आरोग्य या विषयावर देशव्यापी पाहणी

## सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना माहिती देवून सहकार्य करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालयाकडून राष्ट्रीय नमुना पाहणी ८० वी फेरी कुटुंबाचा सामाजिक उपभोग : आरोग्य या विषयावर देशव्यापी पाहणी घेण्यात येत आहे. ही पाहणी जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत घेण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालय सहभागी होत आहे. तरी या सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपली योग्य ती परिपुर्ण माहितीसह वेळ देवून सहकार्य करावे, असे आवाहन उपसंचालक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश आरोग्य क्षेत्राविषयी मुलभुत सांख्यिकी माहिती निर्माण करणे, शासनाकडून पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांचे मोजमाप करणे, सरकारी रुग्णालयाचा वापर किती प्रमाणात होतो, सरकारी व खाजगी क्षेत्रातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, लसीकरण तसेच १५ ते ४९ वयोगटातील गर्भवती महिलांसाठी गर्भावस्थेच्या पूर्व आणि पश्चात घेतलेल्या उपचारांबाबत तपशिलवार माहिती या सर्वेक्षणाच्या माध्यमातून संकलित केली जाणार आहे. या पाहणीची माहिती शाश्वत विकास ध्येय अंतर्गत महत्वाचे निर्देशक तयार करण्यासाठी आणि पाहणीचे निष्कर्ष केंद्र व राज्य शासनाला नियोजन व ध्येय धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. प्रशिक्षीत कर्मचारी शास्त्रोक्त पध्दतीने निवडलेल्या गावांना आणि शहरी भागांना भेट देतील. पाहणी दरम्यान कुटुंबाची संकलित केलेली वैयक्तिक माहिती पुर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## शाळा महाविद्यालयात 'वाचनाचा संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**मंठा । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत वाचन संकल्प या उपक्रमाची माहिती नवीन शैक्षणिक धोरणानुसार स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक पंढरीनाथ काकडे व प्राध्यापक सचिन नरोटे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना वाचन व लेखनाचे महत्त्व समजावून सांगितले. विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाला राज्यातील शाळांमधून उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि वाचन संस्कृती जोपासणे हा शाळांमध्ये १ ते १५ जानेवारी या कालावधीत विशेष वाचन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःचे आवडते पुस्तक वाचून इतरांना त्याविषयी सांगितले. तसेच, वाचनासाठी प्रेरित करणारे उपक्रम, ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक वाचन कार्यक्रम, आणि लेखन स्पर्धाही घेण्यात आल्या.

हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या वैचारिक विकासासाठी उपयुक्त ठरला असून, भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी मागणी पालक व शिक्षकांनी केली आहे. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' यामुळे वाचन संस्कृती बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल निर्वळ यांनी सूत्रसंचालन वंदना मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक इरशाद खान पठाण यांनी केले.

सोशल मीडियाच्या व्यसनी माध्यमापासून दूर राहण्यासाठी वाचन लेखन आत्मोद्धाराचे खूप मोठे साधन आहे. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय कुमार चव्हाण यांनी याप्रसंगी केले

## फेरफार अदालतीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात अनेक ठिकाणी खरेदी विक्री, वारसाद्वारे व इतर कारणास्तव मालकी हक्कामध्ये बदल होण्याचे अनेक विषय असतात. त्यामुळे फेर फाराची अनेक प्रकरणे तलाठी यांच्याकडे प्राप्त होत असतात. अनेक प्रकरणे वेळेत निकाली न निघाल्याने तसेच ती प्रलंबित राहिल्याने नागरिक मोठ्या प्रमाणात तक्रारी करत असतात. तरी सर्व प्रलंबित फेर फार तातडीने निकाली काढून शुल्य प्रलंबितता आणण्यासाठी जिल्हाभरात २ फेब्रुवारी २०२५ रोजी एकाच दिवशी प्रत्यक्ष फेर फार अदालतीचे आयोजन करण्यात यावे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत. प्रलंबित फेरफार निकाली काढण्यासाठी सर्व मंडळ अधिकारी यांच्या मुख्यालयात दि.२ फेब्रुवारीला महसूल अदालतीचे आयोजन करण्यात यावे. दि.२४ ते २७ जानेवारी २०२५ कालावधीत तहसीलदारांनी त्यांच्या अधिनस्त मंडळनिहाय प्रलंबित असलेल्या फेरफाराचा आढावा घ्यावा. दि.२८ ते २९ जानेवारी कालावधीत दुय्यम निबंधक यांच्याशी चर्चा करुन पाठविलेल्या खरेदी विक्री व्यवहाराचा आढावा घेण्यात येईल. दि.३० जानेवारीला फेरफार अदालतीचे नियोजन व प्रसिध्दी करण्यात येईल. दि.३१ जानेवारी २०२५ रोजी तहसीलदार व मंडळ अधिकारी यांच्यास्तरावर सुनावणीसाठी प्रलंबित फेर तात्काळ सुनावणी घेवून निकाली काढावेत तर दि.२ फेब्रुवारीला प्रत्यक्ष फेरफार अदालत घेण्यात यावी. सर्व मंडळ अधिकारी व त्याच्या अधिनस्त सर्व तलाठी यांना संपुर्ण दप्तरासह अदालतीच्या ठिकाणी सकाळी ९ वाजता हजर राहण्याच्या सुचना निर्गमित कराव्यात. मंडळ अधिकारी यांचे कार्यालय नसल्यास ग्रामपंचायत किंवा इतर शासकीय इमारतीच्या ठिकाणी अदालत घ्यावी. शेतकऱ्यांना, नागरिकांना, मंडळ अधिकारी व तलाठी यांना बसण्याच्या व्यवस्थेसह लागणारे साहित्य, संगणक प्रणाली, लॅपटॉप अद्यावतरित्या उपलब्ध करुन द्यावा. तसेच या ठिकाणी उपक्रमाचा फलक, इत्तिवृत्तासाठी तसेच स्वाक्षरीसाठी नोंदवही ठेवावी. फेरफाराबाबत वाद किंवा शंका असतील तर सुनावणी त्याच दिवशी अदालतीच्या ठिकाणी घ्यावी याबाबत दोन्ही पक्षकारांना आगाऊ नोटीस पाठविण्यात यावी. तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी अदालतीचे संपुर्ण नियोजन करावे. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

## महाराणा प्रताप इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा



**परतूर । प्रतिनिधी -** परतुर येथील महाराणा प्रताप इंग्लिश स्कूल परतूर मध्ये वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उदघाटन मा. डॉ.सौ अंजली अंभुरे शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेच्या अध्यक्षा राजपूत मॅडम या उपस्थित होत्या तर प्रमुख अतिथी मध्ये शासकीय आय. टी. आय.परतूर येथील वंदना खडसे, राधे कृष्ण महाविद्यालयाच्या सचिव कोमल राजपूत,राधे कृष्ण महिला महाविद्यालयाचे प्राचार्य कुणाल राजपूत, राधे कृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य वटाणे, पालक अतिथी अरुण चंदने आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी मान्यवरांनी शाळेची विशेष प्रगती करत असल्याबद्दल शाळेच्या अध्यक्षा व स्टापचे कौतुक केले. प्रमुख अतिथी शिक्षण विस्तार अधिकारी डॉ.अंभुरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळा द्यावा असे सांगितले. त्याचबरोबर त्याच्या जीवनात अष्टपैलूत्व निर्माण करण्यासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमाची गरज असते असे सांगितले. शाळेच्या मुख्याध्यापक रचना चंदने यांनी शाळेच्या वर्षभराच्या शैक्षणिक प्रगती संदर्भात माहिती दिली. पालक सभेचे महत्व विषद करून सांस्कृतिक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो हे सांगितले. सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सामाजिक गीते जनजागृती गीते नाटिका अभिनय करून त्यांच्या कलागुणांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी खरात यांनी केले. तर आभार प्रदर्शन उज्वला शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभांगी काळे, रेणुका झोरे,अलका भालेकर, सोनाली जईद,उज्वला जाधव, कल्पना मगर, गौरी जईद, ज्योती शिंदे,प्रथमेश राऊत, खवल इत्यादीने विशेष सहकार्य केले.

## प. पू. कलावती आईंच्या पुण्यतिथी सप्ताहाचे आयोजन

**जालना -** जुना जालना भागातील सराफ नगरातील श्रीहिर मंदिर येथे प्रतिवर्षा प्रमाणे प. पू. कलावती आईंच्या पुण्यतिथी सप्ताहाचे आयोजन २४ जानेवारी ते ३० जानेवारी २०२५ या कालावधीत करण्यात आले आहे. सप्ताहाची सुरुवात गुरुपौर्णिमा भजनाने २३ जानेवारी रोजी रात्री ८ ते ९.३० या वेळेत होईल. सप्ताहातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहेत. सकाळी ७ ते ८.३० :पुण्यतिथी प्रातःस्मरण भजन व वाचन दुपारी साडे दहा ते बारा पुण्यतिथी दुपारचे भजन व वाचन संध्याकाळी साडेचार ते सहा पुण्यतिथी सायंस्मरण भजन आणि अनुभव कथन रात्रौ आठ ते साडेनऊ श्रीकृष्णप्रताप व प्रदक्षिणा सप्ताहाची सांगता ३२ जानेवारी रोजी सकाळी सात ते साडेआठ या वेळेत गुरुमाय गुणगानाने होणार आहे.सर्व भक्तांना विनंती करण्यात येते की, या पवित्र सप्ताहात सहभागी होऊन प. पू. कलावती आईंच्या उपासनेचा लाभ घ्यावा असे संयोजकांनी कळविले आहे.

## अन्नपूर्णा कनिष्ठ महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रम




**मंठा । प्रतिनिधी -** देवगाव फाटा येथील उन्नपूर्ण कनिष्ठ महाविद्यालयात वाचन संकल्प-महाराष्ट्राचा , कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय मंठा येथील वनस्पतीशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक प्रा डॉ. राजेश गायकवाड म्हणाले की 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राज्यातील वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या अभियानाचा उद्देश विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावणे हा आहे.ते पुढे म्हणाले की

वाचन सवयीने व्यक्तिमत्त्व विकासला चालना मिळते, विद्यार्थ्यांचा वैयक्तिक विकास होण्यास मदत होतो. तसेच त्यांच्या जीवनाला नवीन दिशा मिळू शकते. त्याचप्रमाणे वाचनाने ते प्रेरित होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढण्याला मदत होईल, ज्ञान वाढेल व ज्ञानात अधिक भर पडेल असे ते म्हणाले . याप्रसंगी प्रा एन एस उबाळे यांचेही समायोजित भाषण झाले. या कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य प्रा विजय अंकुश , प्रा.डॉ. विशाल अवसोरमल , प्रा. नारायण खरात ,शांताबाई नखाते विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. शहारे , सहशिक्षक हूगे व्ही. एस , प्रा जे.बी भगस , प्रा के डी पांचाळ , प्रा एस.डी. पांचाळ , प्रा एस डी पाटोळे , प्रा श्रीमती ए.बी ढगे उपस्थित होते

तसेच महाविद्यालयील विदयार्थी शुभम उबाळे , बाळू चाळक , पृथ्वीराज बोराडे , अभिषेक खाडे व ओमकार गोंडगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रस्ते व नागरी समस्यांवर युवक काँग्रेसचे रास्ता रोको आंदोलन

## पुढील टप्प्यात महापालिकेला कुलूप ठोको आंदोलन-शेषराव जाधव

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील खड्डेमय रस्ते आणि नागरी समस्यांवर तातडीने तोडगा काढावा, या मागणीसाठी युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष शेषराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली आज गुरुवार दि. २३ जानेवारी रोजी नूतन वसाहत उड्डाणपुलावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. आंदोलनादरम्यान प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत, महापालिकेने या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास पालिकेला कुलूप ठोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला.



रास्ता रोकोमुळे नूतन वसाहत उड्डाणपुलावरून जाणारी वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती. वाहनांच्या रांगा लागल्या होत्या, ज्याममुळे अनेक प्रवाशांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागले. काही प्रवाशांनी आंदोलनकर्त्यांना प्रशासनासमोर मुद्दे मांडण्यासाठी पाठिंबा दिला, तर काहींनी होणाऱ्या विलंबाबद्दल नाराजी व्यक्त केली.

१६ जानेवारी रोजी शेषराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना निवेदन दिले होते. त्यात शहरातील सर्व खड्डे तातडीने बुजवावेत आणि रस्त्यांची डागडुजी करून वाहतूक सुरळीत करावी, झोपडपट्टी धारकांना पीआर कार्ड देऊन रमाई घरकुल योजनेचे नियम सुलभ करावेत, रमाई घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारी रक्कम अडीच लाखांवरून साडेतीन लाख करावी, शहरात सिटी बस सेवा सुरू करावी, प्रत्येक प्रभागात मोफत आरोग्य सेवा सुरू करून वेळ वाढवावी, दलित वस्ती सुधार योजनेचा निधी १०० टक्के वितरित करावा, जलवाहिनींच्या गळतीमुळे खराब होणाऱ्या रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करावी, स्वच्छतेसाठी सुसज्ज यंत्रणा उभारून नियमित स्वच्छता मोहीम राबवावी, स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत पायाभूत सुविधांची अंमलबजावणी त्वरीत करावी, आधी मागण्या करण्यात आल्या होत्या; अन्यथा २३ जानेवारी रोजी आंदोलनाचा इशारा दिला होता. तरीदेखील प्रशासनाने कोणतीच पावले न उचलल्याने आज रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

रास्ता रोकोदरम्यान शेषराव जाधव यांनी प्रशासनाच्या हलगर्जीपणावर टीका करत, शहरातील खड्डेमय रस्ते, जलवाहिन्यांची गळती, वाहतूक कोंडी आणि स्वच्छतेचा अभाव यामुळे जालनेकर त्रस्त झाले आहेत. नागरी सुविधा सुधारण्यासाठी प्रशासनाच्या आश्वासनांवर आता विश्वास राहिला नाही. जर प्रशासनाने या समस्यांवर तातडीने उपाय केले नाहीत, तर पुढील टप्प्यात महापालिकेला कुलूप ठोकून तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

या आंदोलनात जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत रत्नपारखे, भाऊसाहेब कुवारे, संतोष जाधव, दीपक गायकवाड, सुरज छत्रे, किशोर गायकवाड, गजानन भास्कर, दत्ता भिसे, परमेश्वर तिरुखे पाटील, सुखदेव उगले, पांडुरंग गडकरी, गणेश कस्तुरे, दिगंबर सोनोसे, प्रेम गायकवाड, सुभाष नरोडे, अनंत हिवाळे, रामेश्वर हिवाळे, विलास उजेड, प्रदीप लोखंडे, सचिन वानखेडे, कृष्णा रामटेके, बाबासाहेब मिसाळ, सचिन लोखंडे, राहुल मिसाळ आदी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

आंदोलनामुळे जालन्यातील खड्डेमय रस्त्यांची समस्या आणि नागरी समस्यांवर प्रशासनाने तातडीने लक्ष घालण्याची मागणी जोर धरत आहे. आता प्रशासन यावर काय उपाययोजना करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

इनरव्हील क्लब होरायझनतर्फे मुलींच्या निवासी शाळेत विविध उपक्रम

# शाळेला सोलार लाईटस भेट, सवाईकल कॅन्सरबाबत मार्गदर्शन



**जालना । प्रतिनिधी -** इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ. शोभना पालेकर यांच्या अधिकृत भेटीनिमित्त त्यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरील समाज कल्याण विभाग संचलित मुलींच्या निवासी शाळेच्या प्रवेशद्वारावर आणि परिसरात लावण्यासाठी दोन सोलार लाईटसचे लोकार्पण, २०० मुलींना

सॅनिटरी पॅड्सचे पॅकेट वाटप करण्यात येऊन सवाईकल कॅन्सरबाबत मार्गदर्शन करण्यात आले

यावेळी क्लबच्या अध्यक्ष ड. अश्विनी धन्नावत, सचिव ड. पिंकी लड्डा शाळेच्या अधीक्षक सूर्यकला गोसावी यांची उपस्थिती होती. सवाईकल कॅन्सरबाबतचा जनजागृती उपक्रमही यावेळी राबविण्यात आला. डॉ. शोभना पालेकर यांनी उपस्थित मुलींशी संवाद साधताना सवाईकल कॅन्सरच्या सुरुवातीच्या लक्षणांवर प्रकाश टाकला व लसीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले. त्या म्हणाल्या, सवाईकल कॅन्सर रोखण्यासाठी लसीकरण महत्त्वाचे आहे. प्रत्येक मुलीने याबाबत जागरूक होणे गरजेचे आहे. समाजातील स्त्रियांच्या आरोग्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे.

क्लबच्या अध्यक्ष ड. अश्विनी धन्नावत यांनी आपल्या भाषणात मुलींना शिक्षणाबरोबरच स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, स्वच्छता व आरोग्य ही केवळ वैयक्तिक नाही तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. इनरव्हील क्लब नेहमीच सामाजिक उपक्रम राबवून समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील असतो. या कार्यक्रमाला दोनशे मुलींची उपस्थिती होती.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.